जळगाव प्रतिनिधी (दि. ३०) – संशोधनासारख्या स्पर्धेत तरूणाईच्या भविष्याचा प्रतिबिंब दिसत असून अविष्कार मधूनच तरूणांच्या विचारांना निश्चितपणे चालना मिळेल असा आशावाद गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रशांत बोकारे यांनी व्यक्त केला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आज दि.३० रोजी दुसऱ्या टप्प्यात विद्यापीठस्तरीय अविष्कार -२०२५ या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी होते. प्रमुख अतिथी छ.संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विलास सपकाळ, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, व्य.प. सदस्य प्रा.जयदीप साळी, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, अधिसभा सदस्य डॉ.विशाल पराते, वैशाली वराडे, डॉ. एस.आर. पाटील, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, सीए रवींद्र पाटील, अविष्कारचे सचिव डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, समन्वयक नवीन दंदी, सह समन्वयक डॉ. अमरदीप पाटील यांची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना प्रा. बोकारे म्हणाले की, आपल्या देशातील समस्या किंवा आपल्याला निर्माण झालेल्या समस्या सोडवायच्या असतील तर तरूणांनी उत्तम संशोधन करणे आवश्यक आहे. संशोधनामधूनच समस्यांचे निराकरण करता येणे शक्य आहे.विकसीत देशाची धुरा युवकांच्या खांद्यावर असून आजची तरूणपिढी ही कृत्रीम बुध्दीमत्तेच्या (एआय) पुढचाही विचार करायला लागली आहे. देशात संपन्नता यायची असेल किंवा समृध्दी टिकून रहायची असेल तर भारतीय बनावटी वस्तूंचा वापर अधिकाधिक करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. विद्यार्थ्यांना चांगली प्रगती करून मोठे व्हायचे असेल तर कॉपी पेस्ट न करता मुळ संकल्पनेचा विचार करणे आवश्यक असल्याचे मत डॉ. बोकारे यांनी व्यक्त केले.

एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विलास सपकाळ आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, आज नवसंशोधन क्षेत्रात जागतिक संधी निर्माण झाली आहे. या संधीचा विचार करत असतांना संशोधन हे आपल्या गरजांवर अधारित असले पाहिजे. आपल्या संशोधनात कमीतकमी इनपुट आणि जास्तीतजास्त आऊटपुट असायला हवे. संशोधनातून काय साध्य होईल आणि काय साध्य होत आहे हे शोधणे गरजेचे आहे अशी मांडणी त्यांनी केली. संशोधन अधिक उत्तमोत्तम करण्यासाठी आंतरविद्याशाखीय शास्त्रांचा अभ्यास करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांना संशोधना संदर्भात मौलिक सल्ला देत सांगितले की, संशोधकाला धैर्य, चिकाटी, तीव्र आवड या तीन गोष्टींची आवश्यकता आहे.संशोधना शिवाय प्रगती होणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती आणि कल्पनाविष्कार शिवाय जिज्ञासा वृत्ती महत्वाची आहे. अविष्कार सारख्या स्पर्धेतून विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे, किंबहुना राज्याचे व देशाचे नेतृत्व करण्याची संधी मिळत असल्याचेही ते म्हणाले. प्रास्ताविक समन्वयक डॉ. नविन दंदी यांनी केले. परिचय सहसमन्वयक डॉ. अमरदीप पाटील यांनी करून दिला. सूत्रसंचलन डॉ.प्रिती सोनी व डॉ.विजय घोरपडे यांनी तर आभार अविष्कारचे सचिव डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी मानले.

नवसंशोधकांचा अविष्कार - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील पदवी प्रदान सभागृहात सुरू असलेल्या दुस-या टप्प्यात विद्यापीठस्तरीय अविष्कार-२०२५ स्पर्धेत जळगाव, धूळे, नंदूरबार आणि विद्यापीठ प्रशाळेतील पहिल्या टप्प्यात पात्र ठरलेल्या ५२८ संशोधक विद्यार्थ्यांच्या ३३८ प्रवेशिकांची नोंदणी झाली असून यामध्ये ३०४ पोस्टर आणि ३४ मॉडेल्सचे सादरीकरण करण्यात आले.

मॉडेल्समध्ये - सौरऊर्जा सायकल, मॉनिटरींग सिस्टीम्स, ईव्ही चार्जिंग सिस्टीम्स, रोड ट्रॅफिक मॅनेजमेंट, ऑक्सिजन जनरेटर मशिन, अपातकालिन सुचना यंत्र, शुध्द वन औषधी, अध्यापनासाठी प्रतिकृतींची निर्मिती, बकरीच्या दुधापासूनचे साबण, स्मार्ट ॲग्रो गार्ड, ग्रीनर सोल्युशन, स्मार्ट कार पार्किंग, रेन वॉटर हार्वेस्टींग इ. तर पोस्टरमध्ये – केळीवर आधारीत न्युडल्स, औषधांच्या कचऱ्यांचे संसाधनांमध्ये रूपांतर, शेअर्स मार्केटवर गुंतवणूकदारांचा मानसशास्त्रीय अभ्यास, उच्च

उत्पादकतेचा मार्ग म्हणून डिजीटल डिटॉक, द कप बाईट इको कप, स्मार्ट फेस अधारीत बसभाडे प्रणाली, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि बाजारपेठ,सिनेमा व्यवसायाचा विकासावर होणारा परिणाम, उद्योग आणि कृषी क्षेत्राचे जलव्यवस्थापन, शेतीचे यांत्रिकीकरण, बदलते शेतीचे अर्थशास्त्र, संकेत: वास्तविक संवाद प्रणाली, स्मार्ट प्लॅस्टीक बॉटल क्रशर मशीन, भारतीय प्रसार माध्यमांची विश्वासार्हता, नाविन्यपूर्ण पीक नोंदी व्यवस्थापन प्रणाली इ. विषयांवर अधारित संशोधनाचा समावेश होता.

सांस्कृतिक कार्यक्रम रंगले – सायंकाळी अधिसभा गृहात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह कलावंतांनी विविध कला प्रकार सादर केले. कलावंतांनी लोकगीत, भावगीत, नृत्य आदी कलाविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

आज समारोप - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरु असलेल्या दुस-या टप्प्यात विद्यापीठस्तरीय अविष्कार २०२५ या स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ दि. ३१ रोजी दुपारी ३.४५ वाजता होणार आहे. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. व्ही. एल. माहेश्वरी हे अध्यक्षस्थानी तर प्रमुख पाहूणे म्हणून शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य अन्निल राव उपस्थित राहतील. तसेच प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत.

**बातमी नं. २**

जळगाव प्रतिनिधी - पीएम श्री स्कूल केंद्रीय विद्यालय व जवाहर नवोदय विद्यालय, धुळे येथील अकरावीतील एकूण ४२ विद्यार्थ्यांनी 'विज्ञान ज्योती' प्रकल्पांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे शैक्षणिक अभ्यास दौऱ्यानिमित्त भेट दिली. या दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक विज्ञान व संशोधनाच्या क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांची भेट घेतली. कुलगुरू व कुलसचिवांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विज्ञान शिक्षणाचे महत्त्व, संशोधनातील संधी आणि भविष्यातील करिअर मार्गदर्शनाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यासमवेत शिक्षक नॅन्सी, सरला चव्हाण आणि दिव्या सोनार उपस्थित होत्या.

यानंतर विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध विभागांना भेटी दिल्या. यामध्ये जैवशास्त्र प्रशाळा, रसायन तंत्रज्ञान संस्था (UICT), मोबाईल सायन्स व्हॅन तसेच भौतिकशास्त्र प्रशाळेतील अत्याधुनिक प्रयोगशाळांचा समावेश होता. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळांमधील विविध वैज्ञानिक उपकरणांची प्रत्यक्ष पाहणी केली तसेच त्या उपकरणांबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. विशेषतः जैवशास्त्र प्रशाळेतील सूक्ष्मदर्शक यंत्र, इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपसह इतर अद्ययावत संशोधन उपकरणे तसेच भौतिकशास्त्र प्रशाळेतील सेमी-कंडक्टर तयार करणाऱ्या प्रयोगशाळेची माहिती घेताना विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आणि आनंद दिसून आला. काही उपकरणे प्रत्यक्ष हाताळण्याचा अनुभव मिळाल्याने विद्यार्थ्यांचा विज्ञान विषयावरील आत्मविश्वास अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले.

या संपूर्ण अभ्यास दौऱ्यात विद्यापीठाचे समन्वयक प्रा. प्रवीण पुराणिक व प्रा. राजेश जवळेकर यांनी सहकार्य केले. तसेच विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती. हा अभ्यास दौरा विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक ठरला असून भविष्यात विज्ञान व संशोधन क्षेत्रात करिअर करण्यासाठी त्यांना नक्कीच प्रेरणादायी ठरेल, अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३० डिसेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता